भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/०७/२०१७

**१) दरोडा घालण्याच्या पुर्व तयारीत असतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ३०/०७/२०१२ चे ०१.०० वा दर. यातील आरोपी हे दरोडा घालण्याच्या पुर्व तयारीत असतांना मिळुन आल्याने त्यांच्या अंगझडतीत आरोपी क्र०१ कडुन एक जुना लोखंडी चाकु कि. ५०/रु व मिरची पुड , आरोपी क्र.०२ कडुन एक लोखंडी लाकडी मुट असलेली गुप्ती कि. ७५/रु व नॉयलान दोरी कि. ३०/रु ,आरोपी क्र.०३ कडुन एक देशी कट्टा , एक जिंवत काडतुस कि. ५,०००/रु असा एकुन ५,१५५/रु चा माल अंगझडती मध्ये मिळुन आल्याने सरतर्फे फर्यादी सपोनी. उईके यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे तुमसर येथे कलम ३९९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. महस्कर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अल्पवयीन मुलगा टयुशन करीता जातो म्हणुन निघुन गेला घरी परत न आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १८/०७/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा वय १७ वर्ष हा तुमसर येथे टयुशन करीता जातो म्हणुन घरून निघुन गेला घरी परत न आल्याने महाराष्ट्र शाषन परिपत्रक क्र. सी.आर.पी.सी. ०११२ प्र.क्र./५४/पोक दि. १०/०५/२०१३ चे अन्वये व फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) महिलेचा विनय भंग केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ३०/०७/२०१७ चे ०१.०० वा. दर. यातील फिर्यादी ही रात्रीचे वेळी घरी एकटी झोपलेली असतांना यातील आरोपीने फिर्यादीचे घरात जबरदस्तीने प्रवेश करून फिर्यादीचा हात पकडुन अश्लिल वर्तन केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४,४५२ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.डहाके पो.स्टे पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) निष्काळजीपने वाहन चालवुन मोटार सायकलला धडक मारून एक जखमी व एकाचा मृत्यु होण्यास करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २४/०७/२०१७ चे १०.१५ वा. दर. यातील फिर्यादी भाऊसागर रामदास रामटेके वय ४२ वर्ष रा. सावरी हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ व्ही १८२७ वर मृतक बेबीनंदा उर्फे निशा प्रल्हाद रंगारी वय ५० वर्ष हिला बसवुन सावरी वरून भंडारा कडे जात असतांना ,यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील छोटा डाला वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, हयगयीने चालवुन मागेहुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक मारुन जखमी करण्यास व मृतकाचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी तोंडी रिपोर्ट व डॉक्टरी सर्टिफीकेट व डेथ सर्टिफीकेट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ ३०४ (अ)भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना.सार्वे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत

**५) मोटार पंपाची चोरी. :-**

दिनांक २९/०७/२०१७ चे १९.०० वा. ते दि. ३०/७/२०१७ चे ०५.०० वा. दर. यातील फिर्यादी मोहन पुंडलीक निमकर वय ३१ वर्ष, रा. धोप यांचे शेतावर ठेवलेली बीबीसी कंपनीची ३ एच पी मोटार पंप कि. ७,०००/रु ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.सोलंखी पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

६) शुल्लक कारनावरून बेल्टने डाव्या गालावर मारून इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २९/०७/२०१७ चे २२.०० वा. दर. यातील आरोपी हा रोडवर शिवीगाळ करीत असतांना फिर्यादीने त्यास शिवीगाळ कशाला करतोस घरी निघुन जा असे म्हणले असता, यातील अरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून धक्का बुक्की मारून फिर्यादीचे डाव्या गालावर बेल्टने मारून जखमी केल्याने फिर्यादी किशोर मंगरू सदोपाल वय ४१ वर्ष रा. नेहरूवार्ड देव्हाडी यांचे डॉ. रिपोर्ट वरून व ओ.पी. देव्हाडी आकरान्स क्र. ४२/१७ अन्वये पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

७) शेतातील धुऱ्याची खांड फोडल्याच्या कारनावरून दगडाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ३०/०७/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी सुवेध अर्जन अवचट वय ६० वर्ष रा. दिघोरी यांनी आरोपीस ''माझे शेतातील धुऱ्याची खांड तु का फोडलास ती बांधलास का नाही'' शेतातील पुर्ण पाणी वाहुन गेले असे म्हणाला असता, आरोपीने हातात दगड धरून फिर्यादीचे डोक्यावर डावे बाजुला मारून जखमी केले व शिवीगाळ करून मारण्या–पीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

८) ग्रामपंचायत निवडनुक बाबत चर्चेच्या कारना वरून भांडण करून बंडीच्या उभारीने डोक्यावर ,खांदयावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ३०/०७/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील फिर्यादी सुरेश काशिराम पारधी वय ४५ वर्ष रा. वारपिंडकेपार हनुमान मंदिराजवळ १० ते १२ लोकांसह बसुन समोर होणाऱ्या ग्रामपंचायत निवडनुकी बाबत चर्चा करीत असता ,यातील आरोपी हा या ठिकाणी येवुन आता असलेला सरपंच या निवडनुकीत निवडुन येणार नाही असे बोलला त्यावरून फिर्यादीने तोच निवडुन येईल असे बोलल्यावर आरोपीने फिर्यादी सोबत तोंडातोंडी भांडण ,लांबाझोबी करून बाजुला असलेल्या बंडीची उभारी काढुन फिर्यादीचे डोक्यावर डाव्या बाजुला डाव्या हाताचे खांदयावर मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

९) अवैध दारु अडयावर धाडी . :–

दिनांक ३०/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर ,पवनी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून १७ लिटर हा.भ. दारू किंमती ८५०/–रु. १ लिटर २६० मिली.लिटर देशी दारू कि. ३५०/रु असा एकुन १,२००/रुचा माल जप्त करण्यात आला आहे.

31.7

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.